सत्यमेव जयते
# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**
**(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)**
रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई ४००६१४
Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022 27576324

जाक्र/एबाविसेयोआ/मुसे-मविप/नियम प्रस्ताव/2022-23/5078 / नवी मुंबई दिनांक : 17 /11/2022

**प्रति,**
**मा. प्रधान सचिव,**
**महिला व बाल विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-32**

**विषय :- महिला व बाल विकास विभागांतर्गत अंगणवाडी सेविका/ मीनी अंगणवाडी सेविका यांची मुख्यसेविका / पर्यवेक्षिका या गट-क संवर्ग पदोन्नती कोटयातील निवडीने पद नियुक्ती करिता मर्यादित विभागीय परिक्षा नियम तयार करणेबाबत.**

**संदर्भ** :- 1. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय म.रा. पुणे यांचे पत्र क्र.229 दि. 28.11.2020
2. शासन पत्र क्र.मबाआ-2014/प्र.क्र.287/का-7/ दिनांक-18.01.2021
3. या आयुक्तालयाचे पत्र क्रमांक 1155 दिनांक 10.03.2021
4. महिला व बाल विकास विभाग , अधिसुचना दिनांक 4 जून 2022

**महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, गट-क संवर्गातील पदांचा एकत्रित सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव वरिल संदर्भ क्र.1 यांचे मार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता. तसेच मर्यादित विभागीय परिक्षेची नियमावली नसल्यास त्याबाबतचे परिक्षा नियमावलीचे प्रारुप शासनास सादर करण्याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रा अन्वये निर्देश देण्यात आलेले होते.

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या व एकात्मिक बाल विकास सेवा योजना ,आयुक्तालय ,म.रा.नवी मुंबई यांचे अधिपत्याखालील मुख्यसेविका / पर्यवेक्षिका गट-क या संवर्गातील निवडीने भरावयाच्या पदांची शासनाची मागणी , पदांची उपलब्धता व शासन प्रमाणित आरक्षणा नुसार , प्रस्तुत मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे भरण्यात येतील. मुख्यसेविका नागरी प्रकल्पातील संवर्गाकरिता पदोन्नती कोटयातील निवडीने या पध्दतीने नियुक्तीकरिता मर्यादित विभागीय परिक्षा ही एकात्मिक बाल विकास सेवा योजना , आयुक्तालय म.रा. नवी मुंबई यांचे मार्फत घेण्यात येईल. तसेच पर्यवेक्षिका (ग्रामीण व आदीवासी) पदांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद हे ग्रामविकास विभागाच्या निर्देशा नुसार जिल्हा निवड समिती मर्यादीत विभागीय परिक्षाव्दारे परिक्षा घेतील. त्या अनुषंगाने मुख्यसेविका /पर्यवेक्षिका यांना नियुक्ती करिता मर्यादित विभागीय परिक्षा नियमा बाबत वरील संदर्भ क्र.3 चे पत्रान्वये शासनास प्रस्तावित करण्यात आलेले होते..

वरील संदर्भ क्रमांक 4 चे महिला व बाल विकास विभाग , शासन अधिसुचना दिनांक 4 जून 2022 चे अधिसूचनेनुसार महिला व बाल विकास विभागाचे अधिनस्त गट-क संवर्गातील पदांचे सुधारीत सेवा प्रवेश नियम अधिसुचीत करण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरून एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाचे अधिनस्त मुख्यसेविका- नागरी प्रकल्प व पर्यवेक्षिका ग्रामीण व आदीवासी प्रकल्प (जिल्हा परिषद, ग्रामविकास विभाग) यांचे निवडीने करावयाच्या नियुक्ती करिता मर्यादीत विभागीय परिक्षा नियम खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे. मुख्यसेविका / पर्यवेक्षिका यांचे पदोन्नती कोटयातील निवडीने व नामनिर्देशाने करावयाच्या नियुक्ती बाबत अनुक्रमे 50:50 प्रमाण असेल .

**पात्रता व निकष (मुख्यसेविका / पर्यवेक्षिका संवर्ग गट-क )** :

1. मर्यादित विभागीय परिक्षेच्या प्रवेशासाठी अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका (नागरी/ग्रामीण-आदीवासी) या पदावरील या विभागाचे **"सम्मान "** प्रणालीवरील नोंदणीकृत कार्यरत मानधनी कर्मचारी पात्र असतील.
2. **निवडीने नियुक्तीच्या बाबतीत** - मुख्यसेविका या पदांसाठी 104 नागरी प्रकल्पातील स्थानीक असणे आवश्यक आहे तर .पर्यवेक्षिका या पदांसाठी संबंधित अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका ही त्याच जिल्हयातील रहीवासी असावी .**(संदर्भ : महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.13 ऑगष्ट 2014)**
2. कर्मचारी मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर अथवा समकक्ष पात्रता धारण करीत असावा.
3. कर्मचाऱ्याची सेवा अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका या पदावर सलग दहा वर्ष विनाखंड नियमित पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे या बाबत संबंधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र बंधणकारक राहील.
4. मागास वर्गिय कर्मचारी असल्यास जात प्रमाणपत्र अर्ज सादर करते वेळी सादर करणे बंधणकारक राहील तसेच नियुक्तीच्या दिनांका पासून 6 महिन्याचे आत जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. शासन प्रमाणित संगणक प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांका पासून 6 महिन्यात सादर करणे आवश्यक आहे.
6. जाहीरातीतील नमूद अंतीम दिनांकास वयोमर्यादा 45 वर्षाचे आतील अंगणवाडी सेविकाअथवा मीनी अंगणवाडी सेविका पात्र असल्याचे समझण्यात येईल .
7. महिला व बाल विकास शासन अधिसुचना दिनांक 4 जून 2021 मधील गट-क सेवा प्रवेश नियम मधील नियम 10 ते 14 व वेळोवेळी सुधारित शासन आदेश व सुचना बंधणकारक राहतील.

**लेखी परिक्षा बाबत** :

**अ) पदोन्नती कोटा- निवडीने**: 104 नागरी प्रकल्प कार्यालयातील मुख्यसेविका पदाच्या निवड प्रक्रियेसाठी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना ,आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , नवी मुंबई यांचे अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात येईल. पर्यवेक्षीका ग्रामीण/आदीवासी यांचे बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जिल्हा निवड समीती , प्रस्तुत मर्यादित विभागीय परिक्षा उपरोक्त पदांवरील पात्र व कार्यरत अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्याची एकाच वेळी घेण्यात येईल.

**ब** ) अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्याची एकाच वेळी घेण्यात येईल.या करिता एकूण 100 गुणांचे वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective) पेपर असेल व प्रत्येक प्रश्नास एक गूण असेल .

## सर्वसाधारण परिक्षा स्वरूप .

| पेपर | विषय | पात्रता | भाषा | प्रश्न संख्या | वेळ | परिक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण विषय | इंग्रजी | पदवी | इंग्रजी | 10 | 2 तास व (दीव्यांग उमेव्दारा करीता 2.30 मी.) | वस्तूनिष्ठ व बहू पर्यायी |
| | मराठी | पदवी | मराठी | 20 | | |
| | सामान्य ज्ञान | पदवी | मराठी | 20 | | |
| | एकात्मिक बाल विकास सेवा योजना अनुषंगाने योजना व कायदे | पदवी | मराठी | 30 | | |
| | गणित, बुध्दीमत्ता चाचणी व संगणक ज्ञान | पदवी | मराठी | 20 | | |
| | | | एकूण -100 गुण | | | |

उपरोक्त प्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजना , आयुक्तालयांतर्गत मुख्यसेविका व ग्रामविकास विभागाचे अधिनस्त जिल्हा परिषद मधील पर्यवेक्षीका-ग्रामीण/आदीवासी गट-क संवर्गाकरिता अंगणवाडी सेविका अथवा मीनी अंगणवाडी सेविका मधून पदोन्नती कोटयातील निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परिक्षा नियुक्ती करिता सुधारीत नियमावली उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे . कृपया याबाबत शासन स्तरावरुन मान्यता मिळावी ही विनंती.

आपली विश्वासू

(रूबल अग्रवाल, भा.प्र.से.)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई.